अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड




www.surajyadigital.com । शनिवार, दि. २१ मार्च २०२६ । वर्ष : २४ वे अंक : १७१ वा किंमत : ५ रुपये पाने ८

## चाकणकरांची अखेर पडली विकेट!

# ऑफिसबॉयचा भयानक ‘कट’ अब्रूचा सौदा फक्त पाच ‘कोट’!





### ‘कॅप्टन’चे कारनामे

✔ नाशिक/प्रतिनिधी

नाशिकमध्ये तथाकथित अंकशास्त्रज्ञ आणि राजकीय वर्तुळात वावर असलेल्या कॅप्टन अशोक खरात याला बलात्काराच्या गंभीर गुन्ह्यात अटक झाल्याने मोठी खळबळ उडाली आहे. आता या प्रकरणाला धक्कादायक वळण मिळाले असून, या संपूर्ण दुष्कृत्याचा खरा मास्टरमाईंड कॅप्टन खरातचा खास व ऑफिसबॉय संशयित नीरज जाधव असल्याचे समोर आले आहे. दरम्यान अशोक खरातप्रकरणी आता मोठी कारवाई होत असून राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांची अखेर विकेट पडली. अशोक खरात प्रकरणात रुपाली चाकणकरांवर आरोप झाल्यानंतर त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची वर्षा निवासस्थानी भेट घेतली. त्यावेळी झालेल्या चर्चेनंतर रुपाली चाकणकरांनी तात्काळ राजीनामा द्यावा असा आदेश मुख्यमंत्र्यांनी दिल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्यानंतर त्यांनी राजीनामा दिला.

अशोक खरातने महिलांचे लैंगिक शोषण केले. मात्र त्या शोषणाचे भांडवल करून ५८ महिलांची लाज विकण्याचा डाव नीरजने रचल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणाचे गांभीर्य पाहून राज्य शासनाने तपासासाठी एसआयटी स्थापन केली आहे. गुरुवारी (ता.१९) सकाळी आयपीएस अधिकारी तेजस्वी सातपुते यांनी नाशिकमध्ये दाखल होत अशोक खरातची दोन तास कसून चौकशी केली आहे.

### ५८ महिलांवरील अत्याचाराचे फुटेज चोरले

नाशिकच्या कॅनडा कॉर्नर येथील ओजस प्रॉपर्टीज या कार्यालयात स्वयंघोषित कॅप्टन अशोक खरातने अनेक महिलांवर केलेल्या अत्याचाराचे व्हिडिओ, मॉर्फ व्हिडिओ, फोटो व पुरावे सीसीटीव्हीच्या रूपाने जतन केले होते. खरातचा विश्वासू असलेला नीरज जाधव याने डिसेंबर २०२५ साली खरातच्या नकळत कार्यालयातून या ५८ महिलांवरील अत्याचाराचे फुटेज चोरले. नीरजच्या मनात पैशांची हाव निर्माण झाली. त्याने या व्हिडीओंच्या जोरावर खरातलाच ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केल्याची माहिती समोर येत आहे.

### नीरजने आपला मोर्चा पीडित महिलांकडे वळवला

नीरज आणि त्याच्या साथीदारांनी या क्लिप्सच्या बदल्यात खरातकडे ५ कोटी रुपयांच्या खंडणीची मागणी केली. मात्र, खरातने या मागणीला दाद न देता पाच कोटी रुपयांची खंडणी मागितल्याचा आरोप करीत थेट पोलिसांत फिर्याद नोंदविली होती. त्यामुळे नीरजने आपला मोर्चा थेट पीडित महिलांकडे वळवून त्यांच्या अब्रूचा बाजार मांडला. यानंतर, नीरज व इतरांनी शिर्डीतील एका २४ वर्षीय विवाहितेचे मॉर्फ फोटो आणि काही व्हिडीओ थेट तिलाच व्हॉट्सअॅपवर पाठवून धमकावले होते.

### अशोक खरातचा खरा चेहरा जगासमोर

पीडिता मंदिरात दर्शन घेत असताना नीरजसह संशयिताने तिला गाठून व्हिडीओ दाखविले. ती घाबरली व तिने ही बाब खरातला सांगितली. पण खरातने स्वतःला वाचवण्यासाठी तिलाच पोलिसात जाण्यास सांगितले. खरातकडून पैसे मिळण्याची आशा मावळताच नीरजने सिडकोतील २८ वर्षीय विवाहितेचा व्हिडीओ तिच्या मेहुण्याला पाठविला. नीरजचा हाच मास्टरस्ट्रोक त्याच्यावर आणि खरातवर उलटला. मेहुण्याने धीर दिल्याने या पीडितेने सरकारवाडा पोलीस ठाणे गाठले आणि फिर्याद देत अशोक खरातच्या वासनांधाचा खरा चेहरा जगासमोर आणला.

### भोंदू खरातच्या चक्रव्युहात रुपाली अडकल्या

शेकडो महिलांच्या लैंगिक शोषणाचा आरोप असलेला भोंदूबाबा अशोक खरात सोबत रुपाली चाकणकरांचे फोटो आणि व्हिडीओ व्हायरल झाले होते. त्यानंतर चाकणकरांवर टीकेचा भडीमार झाला होता. विविध स्तरातून त्यांच्या राजीनाम्याची मागणी होत होती. राजीनाम्यासाठी दबाव वाढल्यानंतर रुपाली चाकणकरांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची भेट घेतली आणि त्यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर मुख्यमंत्र्यानी रुपाली चाकणकरांना तत्काळ राजीनामा द्यावा असा आदेश दिला. रुपाली चाकणकर या राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा असून त्यांना राज्यमंत्रिपदाचा दर्जा आहे. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया आणि ठाकरेंच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी पत्रकार परिषद घेत रुपाली चाकणकरांचा राजीनामा मागितला होता. रुपाली चाकणकरांनी आधी राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद दाते यांची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी मुख्यमंत्र्यांची तसेच उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेत चर्चा केली. त्यानंतर राजीनाम्याची तयारी केल्याची माहिती समोर आली.

### चाकणकरांचा अखेर राजीनामा

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी अखेर राजीनामा दिला आहे. नाशिकचा भोंदूबाबा अशोक खरात याला अटक केल्यानंतर चाकणकर यांचे खरात सोबतचे काही फोटो आणि व्हिडीओ समोर आले होते. या व्हिडीओमध्ये चाकणकर या खरात याचे पाद्यपूजन करताना बघायला मिळाल्या होत्या. या व्हिडीओवरुन रुपाली चाकणकर यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राजीनामा देण्याची सूचना केल्यानंतर चाकणकर यांनी फडणवीस यांची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी आपला राजीनामा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे शुक्रवारी रात्री उशिरा राजीनामा दिला.

### एखाद्या व्यक्ती सोबत फोटो असतील तर तो गुन्हा आहे का? रुपाली चाकणकर वस्तुस्थिती आणणार समोर

एखाद्या व्यक्ती सोबत फोटो असतील तर तो गुन्हा आहे का? असा सवाल रुपाली चाकणकर यांनी केला आहे. सध्या निर्माण होणाऱ्या प्रत्येक प्रश्नांची पुराव्यासह उत्तर देणार असल्याची माहिती रुपाली चाकणकर यांनी दिली आहे. नुकतीच रुपाली चाकणकर यांनी पोलिस महासंचालक सदानंद दाते यांची मुंबईत भेट घेऊन प्रकरणाची पूर्णपणे चौकशी करण्याची मागणी केली आहे. त्यानंतर चाकणकर आता पुण्याच्या दिशेने रवाना झाल्या आहेत. पुण्यात जाऊन त्या सुनेत्रा पवार यांची देखील आजच भेट घेणार असल्याची माहिती मिळाली आहे. या भेटीत नाशिक भोंदूगिरी प्रकरणाबाबत त्यांचं म्हणणं स्पष्ट करणार असल्याची माहिती मिळत आहे. सध्या निर्माण होणाऱ्या प्रत्येक प्रश्नांची पुराव्यासह उत्तर देणार असल्याची माहिती रुपाली चाकणकर यांनी दिली आहे.

# काँग्रेस शहर, जिल्हा अध्यक्षपदाच्या बदलाचे वारे

- ताई अन् साहेबांची मर्जी चालणार की निरीक्षकाचा राहणार होल्ड?
- संघटन सृजन अभियातून नव्या निवडी
- बुडलेल्या जहाजाचा कॅप्टन होण्यासाठी अनेक इच्छुक
- अध्यक्ष निवडीसाठी काँग्रेसकडून ३७ निरीक्षक जाहीर



✔ सोलापूर : अखिल भारतीय काँग्रेसने देशभरातील अर्ध्याहून जास्त राज्यांतील शहर व जिल्ह्यात संघटनात्मक फेरबदल केल्यानंतर आता महाराष्ट्रातही संघटन सृजन अभियान राबविण्यात येणार आहे. या अंतर्गत राज्यातील सर्वच शहर व जिल्हा काँग्रेस अध्यक्षांची नव्याने नियुक्ती केली जाणार आहे. यासाठी अ. भा. काँग्रेसने ३७ निरीक्षकांची नियुक्ती केली आहे. संबंधित निरीक्षक काँग्रेसचे स्थानिक लोकप्रतिनिधी, पदाधिकाऱ्यांपासून ते काँग्रेस विचारांच्या लोकांची मते घेऊन शहर व जिल्हाध्यक्ष पदासाठी पॅनल तयार करून अ.भा. काँग्रेसकडे पाठविणार आहे.

दरम्यान कधी काळापर्यंत बालेकिल्ला असलेल्या काँग्रेसची सोलापूर शहरासह जिल्ह्यात पुरती दाणादाण उडालेली आहे. हा पक्ष हद्दपार झाल्याचेदेखील मानण्यात येत आहे. या पक्षाचे जहाज जणू काही बुडाल्याचे मानले जात असले तरी सोलापूर शहर आणि जिल्ह्याच्या अध्यक्षपदाचे सिंहासन मिळवण्यसाठी अनेक चेहरे इच्छुक आहेत हे विशेष. सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील काँग्रेसवर ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे आणि खासदार प्रणिती शिंदे या दोघांचे नेतृत्व आहे. हे पिता-कन्येची नव्या अध्यक्षांच्या निवडीत मर्जी चालणार की निरीक्षकांचा व्होल्ड राहणार? हे बघणे या निमित्ताने महत्त्वाचे ठरणार आहे.

अ. भा. काँग्रेसने छत्तीसगड, मध्य प्रदेश, गुजरात, राजस्थान, हिमाचल, हरयाणा, जम्मू काशीमर, मणीपूर, मिझोराम, नागालॅण्ड, तेलंगना, आंध्र प्रदेश, तामीळनाडू, ओरिसा, झारखंडा, उत्तर प्रदेश आदी राज्यांमध्ये संघटन सृजन अभियान राबतीत अनेक शहर व जिल्ह्यातील अध्यक्षांच्या नियुक्तीत धक्कातंत्र वापरले आहे.

पान ७ वर...

### जिल्हाध्यक्षपदासाठी पवार,तांबाळी, जाधवांसह अनेकजण इच्छुक, मात्र आहे तोच राहणार का चेहरा?

सातलिंग शटगर यांची जिल्हाध्यक्षपदी निवड होऊन अवघे सहा-सात महिने झाले आहेत. त्यांच्या काळात सोलापूर महापालिकेसह सोलापूर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढल्या गेल्या मात्र या निवडणुकांमध्ये त्यांची कामगिरी अतिशय फिकी पडली. त्यामुळे या पदावर त्यांना कायम ठेवलं जाणार का महत्त्वाचा मुद्दा आहे. अशातच नव्या जिल्हाध्यक्षपदासाठी भारत जाधव, लतिफ तांबाळ, राजेश पवार आदी चेहरे इच्छुक असल्याची माहिती समोर आली आहेत.

### फिरसे भाऊ की नया चेहरा....

सोलापूर शहर काँग्रेसचे समितीचे अध्यक्ष चेतन नरोटे हे सुशीलकुमार आणि प्रणिती शिंदे यांच्या खास मर्जीमधील आहेत. नरोटे यांना शहराध्यक्षपदावर कायम करण्यासाठी शिंदे पिता-कन्या आपले वजन पणाला लावणार की या पदावर दुसऱ्या चेहऱ्याला संधी देणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### कामत, रसाळे,चाकोते, यलगुलवार, हेमगड्डी शहराध्यक्षपदाच्या सिंहासनासाठी इच्छुक

सोलापूर शहर काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदासाठी निवड प्रक्रिया अखिल भारतीय काँग्रेस समितीने नेमलेल्या निरीक्षकांमार्फत राबवली जाणार आहे, हे आता स्पष्ट झाले आहे. त्यानुसार, शहराध्यक्षपदाचे सिंहासन मिळवण्यासाठी राजन कामत, सुनिल रसाळे, सुदीप चाकोते, मनोज यलगुलवार आणि संजय हेमगड्डी हे चेहरे प्रबळपणे इच्छुक असल्याचे सांगितले जात आहे. सामाजिक संतुलनाचा विचार करता ब्राह्मण समाजाला या पदावर संधी दिली गेली नाही, या खेपेस ती संधी देऊन शहराध्यक्षपद द्यावे असा आग्रह राजन कामत यांचा आहे. पक्षासाठी दिलेले आजवरचे योगदान आणि निष्ठा या आघाड्यांसह अन्य शहराध्यक्षपदाच्या निकषांच्या पात्रतेत आपण उजवे आहोत, त्यामुळे संधी मिळावी अशी राजन कामत यांची मागणी आहे. शहराध्यक्षपदासाठी यापूर्वीदेखील त्यांचे नाव श्रेष्ठींसमोर अनेकवेळा आल्याचे सांगण्यात येते.

सोलापूर शहराचे तापमान
कमाल तापमान
३४.८

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



माझ्यापेक्षा विषारी निघालास !

कल्याण
578-06-457

मुंबई
113-55-258

4 8 9

# सातारा झेडपीत महायुतीमध्ये राडा

- देवाभाऊंनी आखला ‘प्लॅन’
- शिवेंद्रराजेंनी साधला नेम
- राष्ट्रवादी, शिंदेसेनेचा झाला गेम
- पालकमंत्री शंभूराज देसाई जखमी




✔ सातारा : येथील जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्ष निवड प्रक्रिया शुक्रवारी पार पडली. भाजपाने मोठा विजय मिळवत पहिल्यांदाच इथे सत्ता स्थापन केली. दरम्यान, या निवडीच्या झालेल्या राजकीय हालचालींना हिंसक वळण लागले.महायुतीमधील भाजप आणि शिंदे सेना यांच्यात कडवा संघर्ष झाला. निवडीदरम्यान झालेल्या प्रचंड गोंधळात जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या डाव्या हाताला जखम झाली असून, त्यांना भाजप कार्यकर्त्यांकडून धक्काबुक्की झाल्याचा गंभीर आरोप करण्यात येत आहे. या घटनेमुळे ऐतिहासिक परंपरा असलेल्या साताऱ्याच्या इतिहासत प्रथमच असा वाईट प्रसंग घडल्याने राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

जिल्हा परिषद अध्यक्ष निवडीची प्रक्रिया सुरू असताना भाजपा आणि शिंदेसेना, राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये जोरदार घोषणाबाजी आणि ढकलाढकली झाली. या गर्दीत देसाई यांना धक्काबुक्की झाल्याचा आरोप आहे. घटनेनंतर पत्रकारांसोबत बोलताना देसाई म्हणाले की, ‘‘गर्दीत मला नेम का धक्का कसा लागला हे सुरुवातीला समजले नाही. मात्र जेव्हा हाताला जखम होऊन रक्त येऊ लागले, तेव्हा दुखापतीची जाणीव झाली.’’ या घटनेनंतर देसाई समर्थक आक्रमक झाले असून, याचे तीव्र पडसाद उमटतील असा इशारा त्यांनी दिला आहे.

#### पोलीसच अंगावर धावून आले

या राड्यावर प्रतिक्रिया देताना राज्याचे पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी पोलीस प्रशासनाला धारेवर धरले. ‘‘पोलीस बळाचा चुकीचा वापर करून विरोधी सदस्यांवर खोटे गुन्हे दाखल केले जात आहेत. जर थेट मंत्री आणि लोकप्रतिनिधींवरच पोलीस धावून येत असतील, तर ही लोकशाहीसाठी अत्यंत गंभीर बाब आहे,’’ असे पाटील म्हणाले.

#### रस्त्यावरच्या लढाईचा शिंदे यांचाइशारा

दुसरीकडे, आमदार शशिकांत शिंदे यांनी प्रशासनावर टीका केली आहे. ‘‘आमच्या सदस्यांना मतदानाचा अधिकार असतानाही पोलिसांनी त्यांना जबरदस्तीने सभागृहाबाहेर काढले. प्रशासनाचा गैरवापर करून आमच्या सदस्यांवर दबाव टाकण्यात आला आणि त्यांना हात वर करण्यास भाग

पान ७ वर...




### देवेंद्र फडणवीसांच्या फोननंतर भाजपाचा डाव

जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष निवडणुकीत भाजपाने बाजी मारण्यामागे सर्वात मोठा हात छत्रपती शिवेंद्रराजे यांचा असल्याचे बोलले जाते. शिवेंद्रराजेंची ही धुरंधर राजकीय खेळी मानली जात असून फडणवीस यांच्या फोननंतर भाजपाने बाजी उलटवली असल्याचे समोर आले आहे. भाजपाच्या जिल्हा परिषद अध्यक्षपदाचा एका मताने थरारक विजय हा साताऱ्यात भाजपाचा करिश्मा पुन्हा एकदा अधोरेखित करणारा विजय ठरला आहे. भाजपाची ही राजकीय खेळी सातारा जिल्ह्यासह राज्याच्या राजकारणात महत्वपूर्ण ठरली आहे.